जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
दि. 31-01-2020
तरुण भारत

# कुलगुरूंनी घेतली नॅकच्या अधिकाऱ्यांची बैठक

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात नॅक मूल्यांकनाची तयारी सुरू आहे. मूल्यांकनाचा सेल्फ स्टडी रिपोर्ट (एसएसआर) स्वयंम मूल्यमापन अहवालासंदर्भात नॅक कमिटीतील अधिकाऱ्यांची कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी गुरूवारी बैठक घेतली. युजीसीला पाठवण्यात येणाऱ्या एसएसआरची सविस्तर माहिती घेतली. अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

विद्यापीठात नॅक मूल्यांकनाचे काम सुरु आहे. यामध्ये एसएसआर तयार करणे, अधिविभागांच्या प्राथमिक सोयी-सुविधांची पूर्तता करणे, इमारती रंगवणे आदी कामे आहेत. युजीसीला पाठवण्यात येणाऱ्या एसएसआरसाठी सर्व विभागाने आपली माहिती विद्यापीठ प्रशासनाला दिली आहे. येत्या काही दिवसात एसएसआर युजीसीला पाठवण्यात येणार आहे. बैठकीला वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे उपस्थित होते.

# नॅकसाठी सेल्फ स्टडी अहवालाबाबत बैठक

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे नॅक मूल्यांकनाच्या तयारी प्रक्रियेतंर्गत सेल्फ स्टडी रिपोर्टबाबत कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे यांनी अधिकाऱ्यांची गुरूवारी बैठक घेतली. विद्यापीठातर्फे स्वयंम मूल्यमापन अहवाल तयार करण्यात आला आहे. या अहवालसंदर्भातील समिती सदस्यांशी या बैठकीत चर्चा करण्यात आली.

याबाबत माहिती देताता कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर म्हणाले, 'सध्या विद्यापीठात नॅक मूल्यांकनाची पूर्वतयारी सुरू आहे. पहिल्या टप्प्यात स्वयंम मूल्यमापन अहवाल नॅकला पाठवण्यात येणार आहे. यामध्ये अधिविभागातील विद्यार्थीकेंद्री सुविधांची पुर्तता करणे, इमारतीची डागडुजी करणे सुरू आहे.

बैठकीस लेखाधिकारी व्ही. टी.पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे उपस्थित होते.

# यशस्वी होण्यासाठी कौशल्यांची आवश्यकता

## आलोककुमार जत्राटकर : तीन दिवसीय विवेकानंद महोत्सवाचे थाटात उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : आयुष्याच्या विविध क्षेत्रांत यशस्वी होण्यासाठी विविध कौशल्यांची आवश्यकता असते. विवेकानंद महोत्सव हा अशाच वेगवेगळ्या कौशल्यांचा शोध आणि वेध घेणारा आहे. तो चैतन्याचा शोध घेणारा एक मंच आहे व सर्जनशीलतेला वाव देणारे व्यासपीठसुद्धा आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोककुमार जत्राटकर यांनी गुरुवारी केले.

विवेकानंद कॉलेज (स्वायत्त)च्या वतीने शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवनमध्ये आयोजित 'विवेकानंद महोत्सव २०२० - शोध चैतन्याचा' या राष्ट्रीय तीनदिवसीय महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.



शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवनमध्ये विवेकानंद महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना शिवाजी विद्यापीठाचे डॉ. आलोककुमार जत्राटकर. सोबत प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, प्राचार्य अभयकुमार साळुंखे, नीना मेस्त्री-नाईक, एकनाथ सुतार, डॉ. श्रुती जोशी उपस्थित होते.

डॉ. आलोककुमार जत्राटकर म्हणाले, उज्ज्वल भविष्यासाठी स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभागी होऊन आपल्या नावीन्यपूर्ण ज्ञानाचा उपयोग व्यावहारिक ज्ञानात केला तर तो खऱ्या अर्थाने वर्तमानकाळातील यशाचा मंत्र आहे.

कोल्हापूर आकाशवाणीच्या निवेदिका नीना मेस्त्री-नाईक यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे यांनी 'विवेकानंद महोत्सव' या नवीन संकल्पनेचे स्वागत करीत महोत्सवाला शुभेच्छा दिल्या. यावेळी सहप्रायोजक एकनाथ सुतार यांनी मनोगत व्यक्त केले. महोत्सवाच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. कविता तिवडे यांनी आभार मानले. या कार्यक्रमात देशभरातील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींचा सहभाग होता. महोत्सवामध्ये वादविवाद स्पर्धा, अभिवाचन स्पर्धा व पथनाट्य स्पर्धा पार पडल्या.

### आज महोत्सव

महोत्सवात शॉर्टफिल्म मेकिंग स्पर्धा, विद्यार्थ्यांना उद्योजक बनण्यास प्रोत्साहन देण्यासाठी स्टुडंट्स स्टार्टअप स्पर्धा, विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाचा दृष्टिकोन विकसित करण्यासाठी नावीन्यपूर्ण संशोधन स्पर्धा घेण्यात येणार आहेत. १ फेब्रुवारी रोजी फिल्म फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले आहे.

# खांडेकरांचे साहित्य हे संस्कृतीचे संचित

## एकनाथ पगार; शिवाजी विद्यापीठात मराठी विभागातर्फे व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कृतिशील काळाशी सहकंपता साधणारे, साहित्य व कला ही वैश्विक मूल्यांची जाणीव असणारे साहित्य वि. स. खांडेकर यांनी भारतीय साहित्यविश्वाला दिले. खांडेकरांचे साहित्य आपल्या संस्कृतीचे संचित आहे, असे प्रतिपादन देवळा (नाशिक) येथील डॉ. एकनाथ पगार यांनी गुरुवारी केले.



शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभाग आणि अनंत व लता लाभसेटवार प्रतिष्ठानतर्फे आयोजित वि. स. खांडेकर जयंती व्याख्यानमालेत ते बोलत होते. त्यांचा विषय 'वि. स. खांडेकर यांच्या साहित्याचे पुनर्वाचन' असा होता. भौतिकशास्त्र विभागाच्या सभागृहातील या व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी अधिष्ठाता प्रा. डॉ. भारती पाटील, तर अनंत लाभसेटवार प्रमुख उपस्थित होते. डॉ. पगार म्हणाले, खांडेकरांच्या साहित्यातून वैश्विक भान व्यक्त होते. प्रबोधनकाळाचा आशय आणि महात्मा गांधी यांच्या विचारांचा खरा अन्वयार्थ खांडेकरांच्या वाङ्मयातून दिसून येतो. डॉ. पाटील म्हणाल्या, सन १९२० नंतरच्या सामाजिक, राजकीय जीवनाचे खांडेकर हे साक्षीदार आहेत; त्यामुळे त्यांचे वाङमय समजून घेणे महत्त्वाचे ठरते. डॉ. सुनीलकुमार लवटे, रमेश वरखडे, अविनाश सप्रे, संदीप दळवी, अरुण शिंदे, गोमटेश्वर पाटील, किरण गुरव, आदी उपस्थित होते. मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले.



**शिवाजी विद्यापीठात गुरुवारी मराठी अधिविभागातर्फे आयोजित वि. स. खांडेकर जयंती व्याख्यानमालेत डॉ. एकनाथ पगार यांनी विचार मांडले.**

### साहित्यप्रेमातून व्याख्यानमाला

खांडेकरांचे साहित्य हे लेखनाची प्रेरणा आहे. साहित्यप्रेमातून ही व्याख्यानमाला सुरु केली असल्याचे अनंत लाभसेटवार यांनी यावेळी सांगितले.

# ‘खांडेकरांच्या साहित्याचे पुनर्वाचन आवश्यक’

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'आपल्या लेखनशैलीने भारतीय साहित्यात मोलाची भर घालणारे लेखक वि. स. खांडेकर यांच्या साहित्याचे नव्या संदर्भानुसार पुनर्वाचन करण्याची गरज आहे. आजच्या काळातील मूल्ये आणि खांडेकरांच्या साहित्याची नव्याने मांडणी आवश्यक आहे,' असे मत ज्येष्ठ समीक्षक डॉ. एकनाथ पगार यांनी मांडले.

शिवाजी विद्यापीठातील मराठी विभाग आणि नागपूर येथील लाभसेटवार न्यास यांच्या संयुक्त विद्यमानाने विद्यापीठात आयोजित केलेल्या वि. स. खांडेकर जयंती व्याख्यानमाले अंतर्गत ते गुरुवारी बोलत होते. डॉ. पगार म्हणाले, 'फक्त अलंकरण आणि सुभाषितांच्या वरवरच्या वाचनातून खांडेकरांच्या साहित्याशी समरस होता येत नाही. पूर्वग्रह आणि ऐकीव शेरेबाजी बाजूला ठेवून खांडेकरांच्या साहित्यातील जीवनसौंदर्य, भावसौंदर्याचा शोध घेतला जाईल, तेव्हाच पुनर्वाचनाच्या प्रक्रियेपर्यंत पोहोचता येईल.'

डॉ. अनंत लाभसेटवार म्हणाले, 'मराठीचा विद्यार्थी नसतानाही मी खांडेकरांमुळे मराठी साहित्याशी जोडला गेलो. खांडेकरांच्या लेखनाचे संस्कार झाले. दुर्दैवाने खांडेकरांच्या साहित्याचे अपेक्षित भाषांतर झालेले नाही. त्यांच्या साहित्याचे भाषांतर झाले असते तर, कदाचित जागतिक पातळीवरील साहित्याचे सर्वोत्कृष्ठ पुरस्कार त्यांना मिळाले असते.' प्रा. भारती पाटील यांनी खांडेकरांच्या साहित्यातून दिसणारा गांधीवाद आणि आजच्या काळातील या विचारांची गरज यावर भाष्य केले. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले.